रक्तदान जीवनदान

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

## (अधिष्ठाता यांचे कार्यालय)

Jilhapeth, Government Hospital Campus, Jalgaon- 425 001, M.S. (INDIA)
**Telephone & Fax No. 0257- 2222917** **E-mail- deangmcjalgaon@gmail.com**

जा.क्र.शावैमज/आस्था-१/जाहिरात-करार/अध्यापक/चिकित्सालयीन/५६३० /२०२३ दि:-१२/१०/२०२३

प्रति,
मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण)
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई - ४०० ००१

विषय:- प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक (चिकित्सालयीन विषय) या पदासाठी करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत...

संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र क्र.शावैमज/आस्थापना १ व २/प्राध्या/सह-प्राध्या/रिक्तपदे/करार नियुक्ती/ ५२९८/२०२३, दि.३१/०९/२०२३

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव यांच्या आस्थापनेवरील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक (चिकित्सालयीन) ही पदे करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत संचालनालयाच्या www.med-edu.in या संकेमस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्याअनुषंगाने सर्व उमेदवारांना संकेतस्थळावर अर्ज भरण्याचा कालावधी दि.२७/०९/२०२३ ते ११/१०/२०२३ देण्यात आलेला होता.

तथापी संचालनालयाच्या संकेतस्तळावर दिनांक ११/१०/२०२३ रोजीपर्यंत फक्त ०३ उमेदवारांचे (सहयोगी प्राध्यापक, वधिरीकरणशास्त्र -०२, व नेत्रशल्यचिकित्साशास्त्र-०१,) अर्ज प्राप्त् झालेले आहे. त्याअनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव या संस्थेतील एनएमसीच्या त्रुटीचा पुर्तता/रुग्णसेवेची निकड/विद्यार्थी शैक्षणिक हित लक्षात घेता उर्वरित रिक्त पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे.

सबब, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव या संस्थेतील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक (चिकित्सालयीन विषय) या पदासाठी करार तत्वावरील देण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने संचालनालयाच्या www.med-edu.in या संकेमस्थळावर अर्ज भरण्याची मुदत दिनांक ११/१०/२०२३ ऐवजी दिनांक १८/१०/२०२३ पर्यत वाढविण्यात यावी व तसे सोबतचे नोटीफिकेशन (सुचना पत्र) संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे, हि विनंती.

(डॉ.गिरीष ठाकुर)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

Scanned by CamScanner

# सुचना

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव या संस्थेतील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक (चिकित्सालयीन विषय) या पदासाठी करार तत्वावरील देण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने संचालनालयाच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक ११/१०/२०२३ होती. परंतु अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक १८/१०/२०२३ सायंकाळी ५.०० पर्यत वाढविण्यात येत आहे.

अधिष्ठाता
(डॉ.गिरिष ठाकुर)
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जळगाव

Scanned by CamScanner